01-07-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 6/30/2025 11:31 PM Page 1




आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com




वेर्णा, मंगळवार, १ जुलै २०२५ I पाने ४ I ₹ ४

I REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 I Volume 13, Issue 299 I Verna, I facebook.com/dainikherald I Tuesday 1 July 2025 I Pages 4 I ₹ 4

## निवडक

### युक्रेनच्या सफेद सोन्यावर रशियाचा ताबा

**मॉस्को, दि. ३0:** युक्रेन सोबतच्या युद्धात रशियाला मागच्या आठवड्यात मोठं यश मिळालं आहे. रशियन सैन्याने पूर्व युक्रेनमधील शेवचेन्को गावाच्या आसपासच्या भागावर ताबा मिळवला आहे. हे शेवचेन्को गाव डोनेट्स्कमध्ये आहे. रशियाने हे गाव युक्रेनच्या सैन्याकडून हिसकावून घेतलं आहे. रशियाचा या भागावर ताबा मिळवणं महत्त्वाचं आहे. कारण, इथे लिथियमचा मोठा साठा आहे. या साठ्यावर रशियाने ताबा मिळवल्यामुळे युक्रेन आणि डोनाल्ड ट्रम्प दोघांनाही मोठा फटका बसला आहे. युक्रेनच्या खनिजांवर ताबा मिळवण्यासाठी ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी झेलेन्स्की यांच्याशी एक करार केला होता. दुसरीकडे, रशियाने या भागावर ताबा मिळवल्यामुळे याचा फायदा चीनलाही होणार आहे. चीनला लिथियमच्या यामुळे चीनला जागतिक खनिज बाजारात दबदबा निर्माण करता येणार आहे.
शेवचेन्कोच्या आसपासच्या वैज्ञानिकांनी १९८२ मध्ये लिथियमचा साठा असल्याची माहिती दिली होती. जमिनीमध्ये दडलेला हा खजिना ४० हेक्टरमध्ये पसरलेला आहे. शेवचेन्कोमध्ये अंदाजे १३.८ मिलियन टन लिथियमचा साठा आहे. यात लिथियम ऑक्साइडचं प्रमाण जास्त आहे. लिथियम हे ड्रोन आणि आधुनिक सैनिकी उपकरणांमध्ये वापरल्या जाणाऱ्या बॅटरीसाठी खूप महत्त्वाचं आहे. रशियन अधिकाऱ्यांनी सांगितले की, परिस्थिती सुधारल्यानंतर लिथियमच्या साठ्याचं उत्खनन सुरू केलं जाईल. रशियाकडे लिथियमचा साठा आल्याने जगातील शक्ती समीकरणं बदलू शकतात.
एका रिपोर्टनुसार, रशिया आणि चीनला शेवचेन्को गावातील लिथियमच्या साठ्यामुळे खूप मदत मिळणार आहे. लिथियम हे आधुनिक सैन्य आणि तंत्रज्ञानासाठी खूप महत्त्वाचं आहे. यामुळे अमेरिका आणि युक्रेनच्या सुरक्षित पुरवठा साखळीच्या योजनेला धोका निर्माण झाला आहे.

### कोरोनाचा धोका पुन्हा वाढणार ?

**नवी दिल्ली, दि.३0 :** चीनच्या वुहान लॅबमधून बाहेर आलेला कोरोना व्हायरस जगाने पाहिला आहे, जेव्हा दररोज इतके मृत्यू होत होते की माणुसकी रडत होती. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की, कोरोनासारखे २२ व्हायरस अजूनही रांगेत आहेत, जे केव्हाही विध्वंस सुरू करू शकतात.
जेव्हा जेव्हा महामारीचा इतिहास उलटला जाईल तेव्हा कोरोना व्हायरसचा विध्वंस विसरता येणार नाही. ही एक अशी महामारी होती ज्याने लाखो लोकांचा बळी तर घेतलाच, पण त्याच्या संसर्गामुळे मानवी नातेसंबंधांची अवस्था काय असेल याची कल्पनाही करायला भाग पाडते. तुम्हाला हे जाणून धक्का बसेल की या रांगेत आणखी २२ व्हायरस आहेत, जे बाहेर येताच सगळीकडे हाहाकार माजवतील.
हा शोध अशा वेळी लागला आहे जेव्हा जग अजूनही कोविड १९ महामारीच्या नवीन स्ट्रेनशी झुंज देत आहे. चीनच्या वुहान शहरात २०१९ मध्ये कोविड १९ चा पहिला रुग्ण आढळला होता आणि वटवाघळांमध्ये सापडलेल्या कोरोना व्हायरसमुळे वुहान व्हायरस रिसर्च सेंटर कुख्यात झाले होते. पुन्हा एकदा वटवाघळांच्या माध्यमातून २२ प्राणघातक विषाणू पसरू शकतात, जे माणसांना वेदनेने मृत्यू देण्यापूर्वी वेड लावतील.
चीनमधील संशोधकांनी वटवाघळांमध्ये किमान २० नवे विषाणू शोधून काढले आहेत जे प्राणी आणि मानवांसाठी भविष्यात धोका निर्माण करू शकतात. २०१ टक्के ते २०२१ या कालावधीत युन्नान प्रांतातील १४२ वटवाघळांच्या मूत्रपिंडाच्या ऊतींमधून २२ विषाणू ओळखले गेले. यातील दोन विषाणू हेंद्रा आणि निपाह सारखेच आहेत. या संशोधनात एक अज्ञात जीवाणू आणि क्लोसिलिया उन्नानेन्सिस नावाचा परजीवी देखील सापडला आहे. वटवाघूळ फळबागांमध्ये आणि गावाजवळ राहत असल्याने विषाणूमुळे लघवीद्वारे फळे दूषित होण्याचा धोका निर्माण झाला होता. हे मानव किंवा प्राण्यांमध्ये अगदी सहजपणे पसरू शकते.

# वडिलांनी घेतला मुलीच्या मृत्यूचा बदला !

## मुलीच्या प्रियकरावर केला ॲसिड हल्ला | वडिलांना अटक : उत्तर गोवा हादरला !

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पेडणे, दि. ३0 :आपल्या अल्पवयीन मुलीच्या मृत्यूला तिचा प्रियकरच कारणीभूत आहे या रागातून त्या मुलीच्या वैफल्यग्रस्त वडिलांनी तिच्या अल्पवयीन प्रियकर मुलावर दिवसाउजेडी अमानुष ॲसिड हल्ला केल्याची धक्कादायक घटना धारगळ येथे घडली आहे. धारगळ, पेडणे येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर सोमवारी सकाळी साडेसात ते आठ वाजण्याच्या सुमारास एका १७ वर्षीय विद्यार्थ्यावर सिड फेकण्यात आले. या हल्यात तो सुमारे ४0 टक्के भाजल्याची माहिती आहे. सध्या त्याच्यावर गोमेकॉ रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणात निलेश देसाई याला पोलिसांनी करासवाडा येथून अटक केली असून आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असल्याची पोलीस सुत्रांची माहिती आहे.**




आरोपी निलेश देसाईने १७ वर्षांच्या मुलीवर ॲसिड हल्ला केल्याची कबुली दिली आहे, असा दावा केला आहे की त्याच्या मुलीच्या अलिकडेच झालेल्या मृत्यूबद्दल दुःख आणि रागातून त्याने हे कृत्य केले . त्याच्या मुलीच्या मृत्यूत तिच्या संबंधीत प्रियकर विद्यार्थ्याचा हात असल्याचा संशय होता, ज्याचा तपास सध्या सिंधुदुर्ग पोलिस अनैसर्गिक मृत्यू म्हणून करत आहेत.

ॲसिड हल्ल्याप्रकरणी पोलीसांनी अटक केलेल्या संशयित आरोपी बाबत सध्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या दोडामार्ग परिसरात उलट सुलट चर्चा सुरू आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार संशयीत कळणे गावात एक खानावळ चालवत होता .आणि त्याची मुले गोव्यात शिकायला होती . त्यापैकी संशयिताच्या मोठया मुलीचा २0 मे रोजी गोमेकॉत उपचार सुरू असताना मृत्यू झाल्याची माहिती आहे. ७ मे ला तिची प्रकृती अचानक बिघडल्यानंतर तिला प्रथम दोडामार्ग , नंतर म्हापसा आणि नंतर गोमेकॉत दाखल करण्यात आले होते . तिचा मृत्यू नेमका कशामुळे झाला ? याबाबत रुग्णालयाचे अधिकृत रिपोर्टस अद्याप समोर आलेले नाहीत . या मुलीने विषारी द्रव प्राशन केला होता का ? याबाबतही आता उलटसुलट चर्चा सुरू आहे . दरम्यान आपल्या मुलीच्या मृत्यूला संबंधीत युवक कारणीभूत आहे याचा राग मनात ठेवून संशयिताने त्याला संपवण्याच्या प्रयत्न केला असल्याचे बोलले जात आहे

पीडीत विद्यार्थी एका पोलीस कर्मचाऱ्याचा मुलगा असून तो म्हापसा येथील एका उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षण घेत आहे. दररोजप्रमाणे त्याच्या वडिलांनी त्याला धारगळ येथील बस स्टॉपवर सोडले. काही वेळातच एक स्कूटरस्वार युवक काळ्या रंगाचा रेनकोट आणि हातमोजे घालून त्याच्याकडे आला. त्या व्यक्तीच्या हातात पांढऱ्या रंगाची बादली होती, ज्यामध्ये सिडयुक्त पदार्थ होता. क्षणार्धात त्याने बादलीतील द्रव पदार्थ या विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावर व शरीरावर फेकला आणि त्वरित घटनास्थळावरून पळून गेला.

दुर्दैवाने, रस्त्यावर वाहतुकीची वर्दळ असतानाही कोणीही या जखमी विद्यार्थ्याच्या मदतीला धावले नाही. मात्र, काही अंतरावर एका जागरूक नागरिकाने आपले वाहन थांबवून त्याला तत्काळ म्हापसा रुग्णालयात दाखल केले. नंतर त्याला गोमेकॉ रुग्णालयात हलवण्यात आले.

घटनेनंतर उत्तर गोव्याचे पोलीस अधीक्षक राहुल गुप्ता, पेडणेचे पोलीस निरीक्षक सचिन लोकर, मोपाचे पोलीस निरीक्षक श्री. चिमूरकर, श्वानपथक व ठसेतज्ञ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासानंतर करासवाडा येथून संशयित निलेश देसाई याला ताब्यात घेतले आहे. त्याचे मूळ गाव दोडामार्ग असून, प्राथमिक चौकशीत पीडीत विद्यार्थ्यांचे एका मुलीवर असलेल्या प्रेमसंबंधामुळे आलेल्या वैमनस्यातून संशयिताने हा हल्ला केल्याचा आरोप आहे. आणखी काही व्यक्तींना अटक होण्याची शक्यता वर्तवली जात आहेपोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणी सुरू केली आहे. हा विद्यार्थी ज्या ठिकाणी थांबला होता, त्याच्या १00 मीटर परिसरातच त्यांचे घर आहे. या भागातील एका घरावर सीसीटीव्ही कॅमेरा असल्याचे लक्षात आले असून त्याचे फुटेज महत्त्वाचे ठरणार आहे.

या प्रकाराने संपूर्ण पेडणे तालुका हादरून गेला आहे. घटनास्थळी नियमितपणे सकाळी उघडणारा टी–स्टॉल देखील हल्ल्याच्या दिवशी उशिरा उघडल्यामुळे प्रत्यक्षदर्शी उपलब्ध नव्हता. या पाशवी हल्ल्यावर गोवा महिला काँग्रेसने तीव्र शब्दांत निषेध केला असून राज्यातील कायदा–सुव्यवस्था ढासळल्याचा आरोप केला.

महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा डॉ. प्रतीक्षा खलप यांनी म्हटले आहे की , हा हल्ला अमानुष असून गुन्हेगारांमध्ये पान २ ▶

Download the O HERALDO App Today!

The Best MOBILE APP For You

Stay ahead with:

- **Daily E-paper** – Read your favorite newspaper anytime, anywhere
- **Breaking News Alerts** – Be the first to know what's happening
- **Easy-to-Use Interface** – News and services at your fingertips
- **Buy & Sell Section** – Post ads, find deals, grow your business




Download O HERALDO App now

Google Play | App Store

Everything you need, all in one app!

DOWNLOAD THE O HERALDO APP NOW

# मंत्रिमंडळ फेरबदलाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री आणि मंत्री दिल्लीच्या दौऱ्यावर

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३0 :** गोवा मंत्रिमंडळात संभाव्य फेरबदलाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, आरोग्यमंत्री विश्वजित राणे, उच्च शिक्षणमंत्री सुभाष शिरोडकर आणि कळंगुटचे आमदार मायकल लोबो हे दिल्लीच्या दौऱ्यावर गेले आहेत.

राज्यातील पावसाळी अधिवेशन २१ जुलैपासून सुरू होणार असून, त्यापूर्वी मंत्रिमंडळात काही बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या एक मंत्रीपद रिक्त असून, गोविंद गावडेना मंत्रिमंडळातून वगळल्यानंतर ही जागा भरली गेलेली नाही.

मुख्यमंत्री सावंत यांनी सोमवारी दिल्लीमध्ये संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेऊन, सत्तरीतील होंडा येथे सुरू होणाऱ्या हेलिकॉप्टर इंजिन्स एमआरओ प्रायव्हेट लिमिटेड प्रकल्पाच्या प्रगतीबाबत चर्चा केली. यासोबतच पणजीतील मिलिटरी व डेंटल हॉस्पिटलचे इतरत्र स्थलांतर करण्याची आवश्यकता, तसेच गोव्यात सैनिक शाळा मंजूर करण्याची विनंतीही केली.

यानंतर मुख्यमंत्र्यांनी मायकल लोबो यांच्यासह केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. सावंत यांनी स्पष्ट केले की ही बैठक विकासात्मक आणि राजकीय मुद्द्यांवर केंद्रित होती. मात्र, या भेटीनंतर मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चांना नव्याने उधाण आले आहे.

दिल्ली दौऱ्यादरम्यान मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल यांची देखील भेट घेतली. गोव्यातील कृषी व प्रक्रिया केलेल्या अन्न उत्पादने यांच्या निर्यातीस चालना देण्यासाठी, राज्यात अपेडा कार्यालय स्थापन करण्याची विनंती त्यांनी केली. तसेच गोव्यासाठी निर्यात धोरण मजबूत करण्यावरही भर दिला.

दरम्यान, भाजपचे प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांनी या चर्चांना फाटा देत सांगितले की, मुख्यमंत्र्यांचा दिल्ली दौरा पूर्वनियोजित होता. मुख्यमंत्री केंद्रातील वरिष्ठ नेत्यांसोबत राज्याशी संबंधित विविध विकास योजनांवर चर्चा करण्यासाठी गेले आहेत. यात मंत्रिमंडळ फेरबदलाचा काही संबंध नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

आरोग्यमंत्री राणे यांच्या उपस्थितीबाबत विचारले असता, नाईक यांनी सांगितले की, मंत्र्यांना वेळोवेळी विभागीय कामांसाठी दिल्लीला जावे लागते. त्यामध्ये काही गूढ नाही.

# सासष्टी तालुक्यात शेतजमिनीत बेकायदेशीर भराव

■ टीम दैनिक हेराल्ड

## नागरिकांनी व्यक्त केला संताप

**मडगाव, दि. ३0 :** सासष्टी तालुक्यातील नावेली, कोलवा , माजोर्डा, बेतालभाटी , राय यांसारख्या गावांमध्ये शेतजमिनी बेकायदेशीरपणे भरल्या जात असल्याचे प्रकार उघडकीस आल्याने पर्यावरण प्रेमींमध्ये तीव्र चिंता आणि अस्वस्थता निर्माण झाली आहे. ही बाब लक्षात घेऊन सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि स्थानिक रहिवाशांनी अधिकाऱ्यांकडून तातडीने कठोर कारवाई करण्याची जोरदार मागणी केली आहे.

सासष्टी बीडीओ मिळालेल्या माहितीनुसार, अनेक ठिकाणी कोणतीही अधिकृत परवानगी न घेता जमिनी भरल्या गेल्याचे उघड झाले आहे. हे उल्लंघन उच्च न्यायालयाने आदेश दिलेल्या तपासणी दरम्यान निष्पन्न झाले. सदर बीडीओ अहवाल सध्या तयार करण्याच्या प्रक्रियेत असून तो लवकरच पंचायत संचालनालयामार्फत न्यायालयात सादर केला जाणार आहे.

पर्यावरण कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, हे बेकायदेशीर कृती कृषी क्षेत्राच्या हळूहळू होणाऱ्या विनाशाचे संकेत देतात. लोटली मधील कार्यकर्ते झेवियर फर्नांडिस म्हणाले, गोव्यातील शेतीची हळूहळू नासाडी सुरू आहे. शासनाने त्वरित कारवाई केली नाही, तर काही वर्षांत आपल्याकडे वाचवण्यासाठी काहीच उरणार नाही.

अनेक ठिकाणी, शेतांमध्ये रात्रीच्या अंधारात ट्रकमधून चिखल आणि बांधकामाचा मलबा टाकण्यात येतो, जेणेकरून अधिकाऱ्यांना वेळेत याचा शोध लागू नये. कोलवाचे रहिवासी सॅव्हियो रॉड्रिग्ज म्हणाले, अधिकाऱ्यांचा प्रतिसाद धीम्या गतीने होत असून, त्याचा फायदा घेऊन नियम तोडणाऱ्यांची मुभा वाढली आहे. ही फक्त नियोजनातील त्रुटी नाही, तर थेट पर्यावरणीय गुन्हा आहे.

स्थानिकांनी असा आरोपही केला आहे की, हे सर्व काही प्रभावशाली हितसंबंधांच्या संगनमताने विकासाच्या' नावाखाली कायदेशीर प्रक्रिया आणि पर्यावरणीय परवानग्यांकडे दुर्लक्ष करून घडत आहे.

कार्यकर्त्यांनी पंचायत संचालनालय तसेच टाऊन अँड कंट्री प्लॅनिंग (टीसीपी) विभागाकडे केलेल्या मागण्यात अशा बेकायदेशीर कृतींवर त्वरित प्रतिबंधक कारवाई व्हावी , नुकसान झालेल्या शेतीच्या जमिनींची पुनर्बांधणी करणे , आणि पंचायत स्तरावर प्रभावी देखरेख यंत्रणा कार्यान्वित करणे या मागण्यांचा समावेश आहे .

नागरिकांच्या वाढत्या दबावामुळे आणि सामाजिक माध्यमांवर यासंदर्भातील तीव्र प्रतिक्रिया लक्षात घेता, आता सर्वांचे लक्ष बीडीओकडून सादर होणाऱ्या अहवालाकडे आणि राज्य सरकार या प्रकरणावर कोणती ठोस भूमिका घेते याकडे लागले आहे.

या पार्श्वभूमीवर, बेकायदेशीर शहरीकरण व अतिक्रमणाच्या विरोधात जनतेच्या आवाजाला बळ मिळत असून, शेतजमिनींचे संरक्षण आणि पारदर्शक विकास धोरणासाठी नागरी समाज आता अधिक एकवटताना दिसतो आहे.

# रायबंदर–चोडण रो–रो फेरी दहा दिवसांत सुरू होणार

## बुडालेल्या फेरीच्या बचाव मोहिमेला लागणार आणखी चार दिवस

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३0 :** रायबंदर –चोडण मार्गावरील रो–रो फेरी सेवा आगामी दहा दिवसांत सुरू होणार असून, त्यास सरकारकडून मंजुरी मिळाल्यानंतर कार्यवाही केली जाईल, अशी माहिती नदी आणि नौवहन विभागाचे संचालक विक्रमसिंह एन. राजेभोसले यांनी सोमवारी दिली.

पत्रकारांशी संवाद साधताना राजेभोसले यांनी सांगितले की, प्रवासी व दुचाकी वाहनधारकांसाठी फेरी सेवा विनामूल्य असणार आहे. मात्र, चारचाकी वाहनधारकांसाठी पास नसल्यास ३0 रुपये, तर पाससह १५ रुपये शुल्क आकारले जाणार आहे. कार भाड्याने घेणाऱ्यांसाठी १00 रुपये, पर्यटकांच्या वाहनांसाठी ३00 रुपये आणि सहलीसाठी आलेल्या पर्यटकांकडून प्रत्येकी ५0 रुपये आकारले जातील.फेरी सेवा सकाळी ७ ते रात्री ९ पर्यंत सुरू राहणार असून, उर्वरित वेळेत इतर तीन फेरीबोटींमार्फत सेवा दिली जाणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### ▶ फेरी सेवा सकाळी ७ ते रात्री ९ पर्यंत सुरू राहणार

या घोषणेनंतर चोडण गावातील रहिवाशांनी काही प्रश्न उपस्थित करत नवीन रो–रो फेरीबाबत चिंता व्यक्त केली. त्यांची प्रमुख मागणी म्हणजे रायबंदर फेरीची वेळापत्रके स्पष्टपणे दर्शविणे.

चोडण–माडेल पंचायतीचे माजी सरपंच श्रीकृष्ण हळदणकर यांनी सांगितले, फेरी सेवा सकाळी ७ वाजता सुरू होईल आणि रात्री ९ वाजता थांबेल, अशी माहिती देण्यात आली आहे. मात्र वेळापत्रक दोन्ही बाजूंनी लावण्यात यावे, यासाठी आम्ही विभागाकडे मागणी केली आहे.

स्थानिक रहिवासी युझेबिओ डि'सिल्वा यांनी बोटीची वहन क्षमता व सुरक्षिततेबाबत शंका उपस्थित केल्या. मला विचारलेल्या प्रश्नांची काही उत्तरे समाधानकारक नव्हती.



बोटीची वहन क्षमता व पाण्याचे विस्थापन याबाबत मिळालेले उत्तर केवळ ऑपरेटरला माहिती आहे' असे होते, असे त्यांनी सांगितले. तसेच, सुरक्षिततेबाबत उपाययोजना करण्यात आल्याची माहिती देण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान बुडालेल्या 'बेटीम' फेरी बोटीच्या बचाव मोहिमेला आणखी चार दिवस लागण्याची शक्यता आहे, असे संचालक विक्रमसिंह एन. राजेभोसले यांनी स्पष्ट केले.पाण्याखालील फेरी बोट बाहेर काढणे हे अत्यंत कठीण काम आहे, विशेषतः दृश्यमानता कमी असल्याने गोताखोरांना अडचणी येत आहेत. सध्या आम्ही दोन खासगी बचाव संस्थांच्या मदतीने काम करत आहोत. मोहिमेच्या गतीसाठी अतिरिक्त यंत्रसामग्रीही मागवण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

संचालकांनी स्पष्ट केले की, सध्या सुरू असलेल्या ऑपरेशनवर सुमारे २५ ते ३0 लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. यासाठी दोन खाजगी संस्थांकडून सहकार्य घेतले जात आहे.

बेती नावाची फेरी बोट २३ जून रोजी सकाळी टाकीत पाणी भरल्यामुळे अंशतः बुडाली होती. बोटीत असलेल्या तीन दुचाकीही पाण्यात बुडाल्या होत्या, मात्र संध्याकाळपर्यंत त्या बाहेर काढण्यात यश आले.

भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी दक्षता घेण्याची गरज असून,आरएनडी यांनी सुरक्षा नियमांचे पालन अनिवार्यपणे करावे, असेही राजेभोसले यांनी अधोरेखित केले. सतर्कता आणि नियमपालन यावर आम्ही लवकरच औपचारिक सूचना जारी करू, असे त्यांनी सांगितले.

# मुंबई–गोवा ड्रग्ज रॅकेटच्या सूत्रधाराला अटक !

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३0 :** गोवा पोलिसांच्या अँटी–नार्कोटिक्स सेलने आंतरराज्यीय ड्रग्ज तस्करीविरोधातील मोहिमेत मोठे यश मिळवत मुंबई–गोवा दरम्यान कार्यरत असलेल्या ड्रग्ज रॅकेटमधील एक महत्त्वाचा दुवा उद्ध्वस्त केला आहे. या कारवाईत मुंबईतील वांद्रे पश्चिमचा रहिवासी अशरफ शेख याला अटक करण्यात आली आहे.

रविवारी पहाटे एएनसीने गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई केली. पोलिस निरीक्षक साजित पिल्लई यांच्या नेतृत्वाखाली आणि कॉन्स्टेबल मकरंद घाडी व साईराज नाईक यांच्या सहभागाने एक पथक मुंबईला रवाना झाले आणि त्यांनी अशरफ शेख याला अटक केली. त्यानंतर पुढील चौकशीसाठी त्याला गोव्यात आणण्यात आले.

ही अटक एएनसीच्या २१ जून रोजी पुण्याच्या दापोडी भागातून कृष्णा सोनकेल्लू या संशयिताला अटक केल्यानंतर पुढे आलेल्या तपासाचा भाग होती. सोनकेल्लू हा तात्पुरता गोव्यातील हरमल येथे वास्तव्यास होता आणि त्याच्याकडे मेथाम्फेटामाइन सापडले होते. तपासादरम्यान त्याने ही अमली पदार्थ अशरफ शेखकडून मिळविल्याची कबुली त्याने दिली होती, त्यामुळे तपासकऱ्यांनी शेखवर लक्ष केंद्रित केले. सोमवारी अशरफ शेख याला गोव्यातील स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आले, जिथे न्यायालयाने त्याला सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.ही संपूर्ण कारवाई डीवायएसपी नेरलॉन अल्बुकर्क यांच्या समन्वयाखाली आणि एसपी एएनसी सुनीता सावंत यांच्या थेट मार्गदर्शनाखाली पार पडली.

गोवा पोलिसांच्या या कारवाईमुळे मुंबई आणि गोवा दरम्यानच्या अमली पदार्थ पुरवठा साखळीतील एक मोठा दुवा तुटला असून, यामुळे या रॅकेटमधील इतर संबंधांचीही चौकशी अधिक वेगाने होणार असल्याचे पोलिस सूत्रांकडून सांगण्यात आले.